# कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव ता.जि.लातूर

## विद्यार्थी-पालक संपर्क समिती अहवाल

## शै.वर्ष 2019-2020

1) महाविद्यालयामध्ये विद्यार्थी-पालक संपर्क समिती विभाग कार्यरत आहे. दि.08/06/2019 रोजी महाविद्यालयामध्ये विद्यार्थी-पालक संपर्क समितीच्या वतिने इयत्ता 12 वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन व शैक्षणिक वर्ष 2019-20 मध्ये बी.ए.प्रथम वर्ष प्रवेशा संदर्भात प्रवेश संपर्क अभियानाअंतर्गत कनिष्ठ महाविद्यालयांशी प्रतिवर्षाप्रमाणे संपर्क करणे. याबाबत बैठक घेण्यात आली.

2) शैक्षणिक वर्ष 2019-20 मध्ये बी.ए.प्रथम वर्षात प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना वर्षभर वेगवेगळ्या बाबतीत संपर्क साधता यावा यासाठी 'विद्यार्थी दत्तक योजना' राबवली जाते.

3) दि.09/08/2019 रोजी विद्यापीठीय हिवाळी परीक्षा 2019 संदर्भात दत्तक विद्यार्थ्यांशी संपर्क साधुन अधिकाधिक विद्यार्थी परीक्षा फॉर्म भरण्यासाठी प्रवृत्त व्हावेत यासाठी प्रयत्न करण्यात आला.

4) दि.24/08/2019 रोजी महाविद्यालयामध्ये दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाभळगाव संस्थेचा भव्य पालक मेळावा आयोजित केला. यावेळी पंचक्रोशीतील सर्व पालकांना संपर्क साधण्यासाठी विभागाच्या वतीने प्रयत्न केला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणुन श्रीमती वैशालीताई विलासरावजी देशमुख मॅडम उपस्थित होत्या. तर कार्यक्रमाचे मार्गदर्शक प्रमुख पाहुणे आमच्या संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.धिरजभैय्या विलासरावजी देशमुख साहेब यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सन्माननीय सचिव मा.श्री.श्यामरावजी देशमुख साहेब उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राम वाघ सर, संस्थेचे सर्व सन्माननीय सदस्य, विद्यार्थी व पालक यावेळी उपस्थित होते.



पालक मेळाव्यानिमित्त मार्गदर्शन करताना मा. सौ. वैशालीताई देशमुख संस्थेचे सचिव मा. श्री श्यामरावजी देशमुख साहेब व संस्थेचे पदाधिकारी.



दि. २५.०९.१९ रोजी पालक मेळाव्यानिमित्त मार्गदर्शन करताना जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. आर. डी. गायकवाड सर व पालक



दि. २४.०९.१९ रोजी पालक मेळाव्यामध्ये मार्गदर्शन करतांना संस्थेचे अध्यक्ष मा. धिरजभैय्या देशमुख साहेब. व्यासपीठावर संस्थेचे सचिव मा. श्यामरावजी देशमुख साहेब व इतर मान्यवर.




दि. २४.०९.१९ रोजी सर्व विद्याशाखांचा पालक मेळावा आयोजीत करण्यात आला यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राम वाघ सर

5) दि.28/08/2019 रोजी शैक्षणिक वर्ष 2018-19 मधील विषयनिहाय पुरस्काराचे वितरण करण्यासाठी पुरस्कार प्राप्त माजी विद्यार्थ्यां संपर्क साधने व त्यांना पुढील शिक्षणा करिता प्रेरणा देण्यासाठी विभागाच्या वतीने प्रयत्न केला.

6) विद्यार्थी पालक संपर्क समिती विभागाच्या वतीने वर्षभरामध्ये प्रत्येक विषयनिहाय विद्यार्थी उपस्थितीची नोंद घेतली जाते व कमी उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांशी संपर्क साधला जातो.

7) दि.13/02/2020 रोजी विद्यापीठ उन्हाळी परीक्षा 2020 करिता विद्यार्थ्यांशी संपर्क साधुन परिक्षेचे फॉर्म भरण्याची दि.22/02/2020 ही अंतीम तारिख असल्याची माहिती देण्यात आली.

**विद्यार्थी-पालक संपर्क समिती**